| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ३६ वा | शुक्रवार दिनांक १० एप्रिल, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी पोलिसांची कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत वैजनाथ रा.अलगुड ता. बस्वकल्याण जि. बीदर हे दि.०८.०४.२०२६ रोजी तलमोड येथे बॉर्डर जवळ जाधव यांचे शेतासमोर अंदाजे ५,५०० किंमतीची ५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत विशाल रा.वडगाव सि. ता. जि. धाराशिव हे दि.०८.०४.२०२६ रोजी वडगाव सि येथे अंदाजे ६८० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १७ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

शिराढोण पोलीस ठाण`अंतर्गत शोभा रा.वडगाव ता. कळंब जि. धाराशिव हे दि.०८.०४.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ८०० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत वकील रा.सलगरा दि. ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.०८.०४.२०२६ रोजी सु. व्ही एस क्षा प्लॅन्टच्या समोरील बाजूस अंदाजे ४,६०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ४६ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### ॲल्युमिनीयमच्या १,२०,००० किंमतीच्या तारेचे केले नुकसान

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०६.०४.२०२६ रोजी अज्ञात ५ व्यक्तीने तांदुळवाडी शिवारातील भागवत शिवाजी भोसले यांचे शेतामधील सेरेंटिका रिन्युएबल इंडीया ४,५ प्रा.लि. कंपनीचे पवनचक्कीचे ई. एच. व्ही. च्या इलेक्ट्रीक लाईनच्या ५९० एमएम जाडीच्या ॲल्युमिनीयमच्या १,२०,०००किंमतीच्या तारा तोडून नुकसान करुनएमएच४४ यु ०२४६ अशोक लिलॅन्डचे छोटा हत्ती वाहनामध्ये भरुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-समर्थ दिनकर माने, वय २३ वर्षे,रा. विजापुर रोड सैफुल सोलापूर शहर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ह.मु. द्वारका नगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०७.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२),६२, ३२४(४), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती धनादेशांचे वितरण

# गरजूंसाठी मोफत व सुलभ न्याय मिळवून देणे हेच विधी सेवा प्राधिकरणाचे ध्येय-सचिव भाग्यश्री पाटील





धाराशिव (जिमाका):- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष,संत गाडगे महाराज जयंतीचे १५० वे वर्ष तसेच महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन ८ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान करण्यात आले आहे.या कालावधीत जिल्ह्यात सामाजिक समता सप्ताह अंतर्गत शासकीय स्तरावर जनजागृतीपर कार्यक्रम, शिबिरे व विविध विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी आज ९ एप्रिल रोजी येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विधी व सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती. भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले,समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख हे प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयातील पायल अतुल नन्नावरे, आदित्य दीपक कदम, स्वप्नील माने, वैष्णवी बीडबाग, निशा खुडे आणि सुमीत सावंत या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेअंतर्गत तसेच भारत सरकारच्या इतर शिष्यवृत्ती योजनांद्वारे प्रत्येकी ४५ हजार रुपयांच्या धनादेशांचे वितरण करण्यात आले. हे धनादेश श्रीमती. भाग्यश्री पाटील व मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी विधी सेवा प्राधिकरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या लोकअदालत, मध्यस्थी केंद्र, बालस्नेही योजना, चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक १०९८ व १५१०० तसेच इतर विविध विधी सेवा योजनांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच मोफत विधी सेवा सहाय हेल्पलाईन क्रमांक १५१०० संदर्भातील जनजागृती करणाऱ्या भित्तीपत्रिकेचे अनावरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच आदिवासी विभागाच्या विविध शिष्यवृत्ती योजना, राजर्षी शाहू गुणवत्ता पुरस्कार योजना, महाडीबीटी प्रणाली, भारत सरकार शिष्यवृत्ती योजना, स्वाधार योजना, स्वयंम योजना, सैनिकी शाळा शिष्यवृत्ती योजना इत्यादींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास विद्यार्थी, पत्रकार बांधव तसेच अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समाज कल्याण निरीक्षक अतुल जगताप, अतुल मुक्ते तसेच लिपिक संकेत जगताप व संकेत भोसले यांनी व परिश्रम घेतले.

## धाराशिवच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

# जिल्ह्यातील ७ शाळांची 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून निवड-आ. राणाजगजितसिंह पाटील



**धाराशिव (शेख अंजुम)-** धाराशिवच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ७ शाळांची 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यासाठी ही अत्यंत अभिमानास्पद आणि गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने तसा शासन आदेशही जारी केला आहे. राज्यातील ४०५ शासकीय शाळांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास मान्यता मिळाली असून, यात आपल्या धाराशिव जिल्ह्यातील ७ शाळांनी स्थान पटकावले असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

निवड झालेल्या या शाळांमध्ये 'विकसित महाराष्ट्र - २०४७' चे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून जागतिक दर्जाच्या पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्रामुख्याने या सर्व शाळांमध्ये आता पहिली ते दहावीपर्यंतचे वर्ग वाढविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मुला-मुलींना एकाच छताखाली सलग आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थिनींच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतंत्र 'पिंक रूम'ची निर्मितीही या शाळांमधून केली जाणार आहे. प्रत्येक शाळेत ठज/णत शुद्ध पिण्याचे पाणी आणि आधुनिक स्वच्छतागृहांची सुविधाही असणार आहे. जिल्ह्यातून एका शाळेची निवड 'क्रीडा प्रबोधिनी' म्हणून करून तिथे खेळाडूंना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

शिक्षण विभाग आणि विद्यार्थ्यांसाठी हा अभिमानाचा क्षण आहे. जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग आणि शिक्षकांनी घेतलेल्या कष्टांचे हे फळ असून, धाराशिवच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आता शहरांतील मोठ्या शाळांप्रमाणेच सोयीसुविधा मिळणार आहेत. ही निवड केवळ शाळांची नसून, जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवर आपल्या महायुती सरकारने मारलेली मोहोर असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

नागरिकांनीही आपल्या गावच्या या शाळांचा अभिमान बाळगावा आणि आपल्या पाल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी या 'आदर्श शाळां'मध्ये अधिकाधिक मुलांचा प्रवेश करावा, असे आवाहनही आमदार पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील या शाळांची झाली आहे निवड

धाराशिव जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि शिक्षकांच्या निष्ठेमुळे जिल्ह्यातील खालील शाळांची या निवड झाली आहे. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, केशेगाव ता. धाराशिव, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पारा, ता. वाशी, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, होर्टी, ता. तुळजापूर, जिल्हा परिषद माध्यमिक प्रशाला, खामसवाडी, ता. कळंब, पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक प्रशाला, ईट, ता. भूम, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, कसबे तडवळे, ता. धाराशिव, पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक प्रशाला, शिराढोण, ता. कळंब

या सर्व शाळा जिल्ह्यासाठी भूषणावह : आमदार पाटील

जिल्ह्यातील ७ शाळांची निवड झाल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी जिल्हा परिषद शिक्षण विभाग, मुख्याध्यापक, शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले आहे. आपल्या धाराशिव जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करणारी ही मोठी उपलब्धी असून या शाळांना मिळणाऱ्या आधुनिक सुविधांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल. जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आपले सातत्याने प्रयत्न सुरू असून, या निवड झालेल्या शाळा जिल्ह्यासाठी भूषणावह ठरतील असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# शेतकरी पुत्रांचा अभिमान! किणी गावातील दोन तरुणांची पोलीस दलात दमदार एंट्री



**धाराशिव (रामेश्वर डोंगरे ):-** धाराशिव तालुक्यातील मौजे किणी येथील दोन शेतकरी पुत्रांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर यशाची नवी उंची गाठत पुणे शहर पोलीस दलात निवड मिळवली आहे. कु. रितेश राजेंद्र दंडनाईक आणि कु. विनय विजयकुमार पवार यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तुगाव येथील भाजप तालुका चिटणीस सचिन लोमटे यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याला रितेश व विनय यांचे आई-वडील, नेताजी मोरे, विनोद शिंदे, सुजाता मोरे, सुषमा लोमटे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी या यशस्वी तरुणांवर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांचा गौरव केला.

जिद्दीची कहाणी परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, आत्मविश्वास आणि चिकाटी यांच्या जोरावर यश मिळवता येते, हे या दोन्ही तरुणांनी सिद्ध करून दाखवले आहे. शेतकरी कुटुंबातील अडचणींवर मात करत त्यांनी आपले ध्येय गाठले.

भावाचा आदर्श - यशाची प्रेरणा विशेष म्हणजे, रितेशचा भाऊ रोहित दंडनाईक याची एक वर्षापूर्वीच पोलीस दलात भरती झाली होती. भावाने खाकी वर्दी परिधान करून निर्माण केलेला आदर्श डोळ्यासमोर ठेवत रितेशनेही मीही पोलीस होणारच! असा निर्धार केला आणि अवघ्या एका वर्षात त्याने ते स्वप्न सत्यात उतरवले.

भावाच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कठोर परिश्रमामुळे रितेशने हे यश संपादन केले. ही आनंदवार्ता समजताच आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले.

गावासाठी अभिमानाचा क्षण एकाच गावातील दोन तरुणांची पोलीस दलात निवड झाल्याने संपूर्ण किणी गावात आनंदाचे वातावरण असून या यशामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे.

# तोंडावर पांघरुन टाकुन मारहाण करुन मोबाईल व रोख रक्कम जबरदस्तीने काढुन घेतले

बेंबळी(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०६.०४.२०२६ रोजी उमरेगव्हाण शिवारात सेरेन्टिका पवनचक्की कंपनीचे प्लान्ट वरील वाचमन फिर्यादी नामे- दिलीप राजकुमार चाकुरे, वय ३८ वर्षे, रा. बामणी ता. जि. धाराशिव यांना अनोळखी चार इसमांनी तोंडावर पांघरुन टाकुन लोखंडी रॉड,पाईप व काठीने मारहाण करुन फिर्यादीचा मोबाईल व रोख रक्कम ५,००० असा एकुण २०,००० किंमतीचा माल जबरदस्तीने काढुन घेतले प्लान्ट मधील तांब्याच्या तारांची चोरी करुन पळुन गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- दिलीप चाकुरे यांनी दि.०८.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९(६),१२७(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अंतर्गत तानाजी रा. भोनगिरी ता. भुम जि. धाराशिव यांनी दि. ०८.०४.२०२६ रोजी शासकीय दुध डेअरी जवळ रोडवर भुम येथे पिकअप क्र एमएच २५ एजे १८३५ मध्ये गोवंशीय जातीच्या ४ जर्शी गायी एकुण ४०,००० किंमतीचचे गोवंशीय जनावरे क्रुरपणे भरुन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना भुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(ड) सह कलम ५(अ)(ब),९(ए) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## आता विचार करावा लागेल

अमेरिका-ईस्त्राईल हे ईराण सोबत युद्ध करीत होते. या युद्धाला काही दिवसासाठी विराम, स्थगिती दिली गेली आहे. हा निर्णय अमेरिकेचा आहे. अमेरिकेच्या हाती काहीच लागत नव्हते. ईराण हा शर्तीने लढत होता. जशासतसे उत्तर देत होता. एकंदरीत इराणची चिकाटी पाहून आगामी काळात अमेरिका शस्त्रसंधीची घोषणा करेल असे वाटत होते तसेच झाले. काही काळासाठी युद्धविराम देण्यात आला आहे. इराणच्या काही शर्ती होत्या. इराणे काही नाकेबंदी केली होती ती सर्वासाठी आडचणीची होती. होर्मुज समुद्रीमार्गावर इराणचा ताबा आहे तो आजही राहणार आहे. त्यामुळे याचा फायदा सर्वाधिक भारताला होणार आहे याचा मार्गे भारतात इंधन,गॅसचे जहाज येत होते. इराणने शर्तीने लढले, त्यात जो अमेरिकेले निर्णय घेतला तो अमेरिकन नागरिकांना आवडला नव्हता. मुळात तो योग्यच नव्हता. कोणावरही असे आक्रमकता लादणे योग्य नाही. आज तसे पाहिले तर लहान असो किंवा मोठा देश असो जो- तो काही बाबतीत स्वयंपुर्ण आहेत. सक्षम आहेत. ईराण तर आर्थिकदृष्टया संपन्न देश आहे. त्याने अल्पावधीत मिसाईल तयार केले. घातक शस्त्रात्रे इराणकडे आहेत तसे पाहिले तर जगात सर्वच देश हे आत्मसंरक्षणासाठी सक्षम आहेत. पुर्ण काळजी घेवून वाटचाल करीत आहेत. ईराणकडे इंधनाचा मोठा पैसा आहे. जगात इंधनसम्राट ईराण आहे. आर्थिकदृष्ट्या संपन्न असणारा देश समजला जातो. त्यामुळे आज अमेरिकेसारख्याशी टक्कर दिला आहे. ईराणमधील परिस्थिती सुधारण्यात वेळ लागणार आहे. तो पर्यंत काळजीचे ठरणारे आहे. युद्ध स्थगित केले याचा अर्थ सर्व परिस्थिती पुर्ण पदावर आहे असे नाही. पुर्वपदावर येण्यासाठी वेळ लागणार आहे. या युद्धजन्य स्थितीत भारतीयांनी काय शिकले यावर चिंतन झाले पाहिजे. अशी परिस्थिती आगामी काळात घडल्यास कशी मात करता येईल याबाबत चिंतन झाले पाहिजे. मुळात अमेरिकेची चाल योग्य नाही, ट्रम्प यांच्या चालीने जगावर संकट आले आहे. कधी टेरिफ लावण्याचा प्रयत्न असो किंवा ईस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून ईराणशी युद्ध असो हे कृत्य चुकीचे आहे. काही ही गरज नव्हते तरी ईराण सोबत युद्ध करण्याची? जगात आपला दबदबा निर्माण केल्यासाठी उचलेले पावुल आहे. युद्ध परवडणारे नाही हे मान्यच केले पाहिजे. ते अमेरिकेला सुद्धा कळते. तरी ईराण एका आठवड्यात शरण येईल असे वाटत असल्याने की, युद्ध छेडले. ट्रम्प यांना या युद्धामुळे काय हस्तगत झाले. उलट एक प्रकारे हसू झाले आहे. त्यामुळे आता या युद्धजन्य परिस्थितीचा भारतीयांनी विचार करून आगामी वाटचाल केली पाहिजे. कोणती संकटे आली व यापासून काय शिकलो याचा विचार केला पाहिजे. पेट्रोल-डिझेलची झळ बसली नाही. केवळ स्वयंपाकाच्या गॅसची झळ बसली, तीही फार तिव्र जाणवली नाही. तसा मोठा त्रासही झाला नाही. इंधनाचा तुटवडा जाणवला नाही कारण ईलेक्ट्रिक गाड्याचा भरणा अधिक आहे. स्वयंपाकाचा गॅसला पर्याय नाही. पुर्वी गोबरगॅस होते, आता जनावरेच शिल्लक नाहीत, त्यामुळे गोबर उत्पन्न होत नाही. आता यापुढे सुर्यचुलीची निर्मिती व प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात होणे अपेक्षित आहे. सुर्यचुली सोलारपासून तयार केल्या पाहिजेत. एक तर ऊन्ह विकत मिळत नाही ते तर निसर्गाने मोफत दिले आहे. वास्तविक इतर देशात सुर्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला जातो तसे भारतीयांनी केले पाहिजे. विचार केला तर मोबाईल हवेवर चालतो, हवेस मोबाईल कंपन्या पैसे मोजत नाहीत. तसे सुर्याचुली निर्माण केल्यातर आपोआप गॅसची मागणी कमी होईल. आता युद्ध थांबल्याने गॅस भारतात येईल, भारताने पर्याय शोधले आहेत. ते ईतर देशातून सुरक्षित मार्गातून गॅस मागविला जात आहे. भारतात चोवीस दिवसानंतर मिळत आहे. तसे पाहिले तर एका कुटुंबियांना एक ते दिड महिणे गॅसची टाकी लागते. ते सध्याला योग्य आहे. कोणीही गॅस नाही म्हणून उपाशी राहीला नाही मात्र आता भारतीयांनी विचारपुर्वक गॅसला पर्याय शोधला पाहिजे. युद्धामुळे भारतीयांना शहाणे केले आहे. युद्धामुळे अनेक बाबी ज्या संकटावर मात करता येवू शकतात त्या करता येवू शकतात. त्याचे ज्ञान प्राप्त झाले आहे. त्यामुळे शासनाने इलेक्ट्रिक गाड्या हा इंधनाला पर्याय दिला तशाच प्रकारे आता गॅस बाबत निर्णय घेणे उचित ठरणारे आहे. छतावर सौरऊर्जाचे प्लांटची उभारणी केली आहे. त्यामुळे महावितरणकडून वीज घेत नाहीत तर त्यांना विकली जात आहे. तसे डोके चालवुन गॅस सिलेंडर बाबत विचार झाला पाहिजे. पर्याय आहेत तो शोधला पाहिजे. मुळात आपल्याकडे संशोधनाची वृत्ती नाही. आळशी आहोत म्हणून जपान, जर्मन आदि देश पुढे आहेत. भारतीयांकडे मोठी बुध्दी आहे. तीचा वापर करून स्वयंपाकाच्या गॅस बाबत पर्यायर निर्णय घेतला पाहिजे. ईराणच्या युद्धामुळे अनेक बाबी कळून आल्या आहेत. भारत हा सक्षम देश आहे. त्यामुळे कोणी डोळे वटारू शकत नाही. भारताकडे वक्र दृष्टिने पाहू शकत नाही असे सामार्थ्य भारतीयांनी निर्माण केले आहे. त्यामुळे आगामी अल्प काळात गॅस बाबात वेगळा निर्णयाची गरज आहे. यात स्वयंपूर्ण होणे अपेक्षित आहे. ते शक्यही आहे. ट्रम्प यांनी जी जगाला भिती दाखविण्या केविलवाणी प्रयत्न केला तो जगाला दिसला आहे. यापुढे भारतीयांनी स्वयंपुर्ण, स्वावलंबी होण्यात व वागण्यात शिकले पाहिजे. पुर्णस्वयंपूर्ण बनले पाहिजे. भारत अनेक बाबतीत स्वयंपूर्ण आहे. काही बाबतीत परावलंबी आहे. अशा स्थितीत विचारपर्वुक निर्णयाची मोठी गरज आहे. पुन्हा अमेरिका इतरांच्या वाटेला जाईल असे वाटत नाही. इराणने मोठी अद्दल घडविली आहे. अमेरिकेने मुळात युद्धात सहभाग घेण्याची गरज नव्हती. ग्रामीण भाषेत तोंडघसी पडल्यासारखे दिसून येत आहे. युद्धाची प्रत्यक्षात झळ बसली नसली तरी गॅसचमुळे नवे संकट निर्माण झाले आहे हे विसरता येत नाही. त्यामुळे भारतीयांनी जोमाने स्वयंपाकाच्या गॅस बाबत पर्याय शोधला पाहिजे. पुन्हा युद्धाचा प्रसंग आला तरी गॅस मिळणार नाही म्हणून घारबण्याचे कारण नाही अशी तयारी भारतीयांनी ठेवण्याची गरज आहे.

# महापारेषणची बाभळेश्वर-कुडूस ४०० के.व्ही. वीजवाहिनी कार्यान्वित

## मुंबई, ठाणे परिसरातील विजेची मिटली चिंता







**मुंबई,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा (महापारेषण) महत्त्वाकांक्षी बाभळेश्र्वर-कुडूस ४०० के.व्ही. हा वीजवाहिनी प्रकल्प गुरूवारी (दि.९) पूर्ण होऊन वीजवाहिनी कार्यान्वित करण्यात आली. या प्रकल्पामुळे वीजपुरवठा अधिक सक्षम, स्थिर आणि विश्र्वासार्ह होणार आहे. यामुळे सुमारे ५ मेगावॅट वीज नुकसान कमी होणार असून मुंबई महानगर प्रदेशातील विद्युत दाबामध्ये योग्य ती सुधारणा होणार आहे. तसेच या व्दिपथ वाहिनीवरून सुमारे ३००० मेगावॅटपर्यंत अतिरिक्त वीज वहन क्षमता उपलब्ध होणार असून मुंबई, ठाणे, पालघर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना मोठा फायदा होणार आहे.

२०१० मध्ये मंजूर झालेल्या या प्रकल्पाची अंमलबजावणी मेसर्स कल्पतरू प्रोजेक्टस इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीमार्फत करण्यात आली. सुरुवातीला २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असलेला हा प्रकल्प विविध अडचणींमुळे लांबला होता. मात्र, गतिमान शासनामुळे आणि संबंधित यंत्रणांच्या समन्वयामुळे अखेर मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्यात आले.

या प्रकल्पांतर्गत एकूण ७१५ मनोरे उभारण्यात आले असून सदर व्दिपथ वाहिनीची लांबी सुमारे २२८ कि.मी. आहे. यापैकी नाशिक विभागात ४८५ मनोरे उभारणी आणि ३०४ सर्किट कि.मी. तारा ओढण्याचे काम, तर वाशी विभागात २३० मनोरे उभारणी आणि १५२ सर्किट कि.मी. तारा ओढण्याचे काम पूर्ण झाले आहे.

प्रकल्प राबविताना अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागला. पुणे जिल्ह्यातील जागतिक दर्जाच्या रेडिओ दुर्बिणीच्या (ऋच्ठढ) परिसरातून मार्ग जात असल्याने विशेष परवानग्या घ्याव्या लागल्या. तसेच जमिनीचे मोबदले, वनविभाग परवानग्या, राईट ऑफ वे (मार्गाधिकार) (ठेथ) समस्या, साहित्य वाहतूक यांसारख्या अनेक आव्हानांवर मात करण्यात आली. काही भागात जंगलातून साहित्य वाहून नेण्यासाठी मानवी श्रमांचा वापर करावा लागला, तर काही ठिकाणी वीजवाहिन्यांवर हॉटलाइन स्ट्रिंगिंग करून काम पूर्ण करण्यात आले.

या वीजवाहिनीमुळे सद्यस्थितीतील पडघे-बाभळेश्र्वर १ व २ या वीजवाहिनीवरील ताण कमी होणार असून प्रणालीची विश्र्वासार्हता वाढणार आहे. कुडूस उपकेंद्राला अतिरिक्त वीज स्रोत उपलब्ध होऊन मुंबई परिसरातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता सुलभ होणार आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, महसूल विभाग, पोलिस आणि वनविभाग यांच्या सहकार्य व मदतीमुळे हा प्रकल्प मार्गी लागल्याचे महापारेषणने म्हटले आहे.

------------

सांघिक कामाचे यश

------------

मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली महापारेषणचे संचालक ( प्रकल्प/संचलन) श्री. सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत यांनी व त्यांच्या चमूने ही यशस्वी कामगिरी केली आहे.

-----------

बुलेट पॉईंट्स :

मुंबई, ठाणे परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम व स्थिर

प्रकल्पामुळे सुमारे ५ मेगावॅट वीज नुकसान कमी होणार

व्दिपथ वाहिनीव्दारे ३००० मेगावॅटपर्यंत अतिरिक्त वीज वहन क्षमता

मुंबई, ठाणे, पालघर व अहिल्यानगर जिल्ह्यांना मोठा फायदा

एकूण ७१५ मनोरे उभारणी; सुमारे २२८ कि.मी. लांबीची वीजवाहिनी

नाशिक विभागात ४८५ मनोरे, वाशी विभागात २३० मनोरे उभारणी

GMRT परिसरातून मार्गामुळे विशेष परवानग्यांची गरज

RoW, वनपरवानग्या, मोबदले यांसारख्या अडचणींवर मात

जंगल भागात मानवी श्रम व हॉटलाइन स्ट्रिंगिंगचा वापर

पडघे-बाभळेश्र्वर वीजवाहिनीवरील ताण कमी होणार

कुडूस उपकेंद्राला अतिरिक्त वीज स्रोत उपलब्ध

स्थानिक प्रशासन, लोकप्रतिनिधी व विविध विभागांचे सहकार्य

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्प पूर्ण

महापारेषणच्या अधिकाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नांचे यश

## पगार लवकर संपतो, तज्ज्ञांनी सुचवला ५०-३०-२० फॉर्म्युला

# जाणून घ्या खर्चावर कसे नियंत्रण ठेवायचे?




जेव्हा नोकरी मिळाल्यानंतर पहिला पगार मिळतो तेव्हा अनेकांना आनंद होतो. जेव्हा महिना संपत येतो तेव्हा आर्थिक चणचण भासते. जवळपास प्रत्येकाची अशीच स्थिती असते. फायनान्शिअल प्लॅनिंग स्टँडर्डस बोर्डच्या सीईओ दांतेडी गोरी यांनी म्हटले की पैशाचे व्यवस्थापन करणे म्हणजेच कमावणे, सुरुवातीलाच खर्च आणि बचत करणे, तीन गोष्टी एकाच वेळी सांभाळणे चांगले असते.

दांते यांच्यामते सर्वात सोपा फॉर्म्युला ५०-३०-२० नियम आहे. या नियमाचा वापर करुन योग्य प्रकारे पगाराच्या रकमेचं व्यवस्थापन करता येऊ शकतं. तुमच्या पगाराच्या ५० टक्के रक्कम आवश्यक गोष्टींवर खर्च करण्यासाठी वापरावी. ज्यामध्ये घरभाडे, वीज आणि पाणी बील, अन्न धान्य आणि प्रवासाचा खर्च असेल. तर, ३० टक्के रक्कम खरेदी, चित्रपट पाहणे, पर्यटन किंवा हॉटेलिंगसाठी वापरावी. तर, २० टक्के रक्कम भविष्यासाठी आर्थिक ध्येय निश्‍चित करुन बचत म्हणून ठेवावी. आपत्कालीन फंड, गुंतवणूक आणि निवृत्तिसाठीची रक्कम यासाठी २० टक्के रकमेचा वापर करावा.

दांते यांच्या मतानुसार काही लोक दररोजच्या छोट्या खर्चाला गांभीर्याने घेत नाहीत. म्हणजेच सकाळी कॉफी घेणं, ऑनलाईन साहित्य मागवणे, कार बुकिंग यामुळे मोठा खर्च होतो. सर्व काही गोष्टी व्यवस्थित करण्याचा प्रयत्न अनेक जण करतात. एकाच वेळी शंभर बदल करण्यापेक्षा एक दोन छोट्या बदलांपासून सुरुवात करा.

प्लानयोरवरल्ड डॉट कॉमचे संस्थापक आणि सीएफओ विप्लव मजूमदार यांच्या मते सुरुवातीला बजेट खूप टाईट केल्यास ते फार दिवस टिकणार नाही. सुरुवातीला मासिक, तिमाही, सहामाही आणि वार्षिक खर्च ट्रॅक करा. त्यानंतर तुम्ही जी बचत करायचे ठरवले होते तितकी रक्कम शिल्लक राहिली की नाही हे पाहा.

अनेकदा आजारपण, नोकरीत समस्या किंवा मोठा खर्च करावा लागतो. अशावेळी आवश्यक गोष्टींना प्राधान्य द्या. अनावश्यक खर्च काही दिवस थांबवा आणि आपत्कालीन फंडात जमा असलेल्या रकमेचा वापर करा.

५०-३०-२० नियम तुम्ही वापरा, प्रत्येक खर्च लिहून ठेवा आणि भविष्यासाठी बचतीचा मार्ग वापरा. पगाराशिवाय इतर उत्पन्नाचे मार्ग देखील निर्माण करता येतात का पाहा.

## नारी शक्ती वंदन : महाराष्ट्र अग्रेसर

जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी, या एका कवितेच्या ओळी साऱ्यांनाच अवगत असल्या, तरी आपल्या देशात महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग हा तसा मर्यादितच राहिला आहे. केवळ साहित्य किंवा इतिहासातील चार- दोन दाखले देऊन हा विषय संपत होता. त्यामुळेच भारतात महिलांचे सशक्तीकरण हा केवळ चर्चेचा विषय होता. शहरी भागात शिक्षणाच्या सुविधांमुळे थोडी बरी स्थिती असली, तरी ग्रामीण भागात मात्र विदारक परिस्थिती होती. मात्र २०१४ नंतर देशात हे चित्र बदलायला सुरुवात झाली. देश सशक्त व्हायचा असेल, तर स्त्री सशक्त झाली पाहिजे हे स्वप्न पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला सशक्तीकरणाला प्राधान्य दिले आणि त्यासाठी विविध योजना आणून त्याची अंमलबजावणीही सुरू केली. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारच्या योजना राबवितानाच राज्याच्याही योजना सुरू करून महिला सक्षमीकरणाला बळ दिले. त्यामुळे पाळण्याची दोरी धरणारे हात आता देशाच्या अर्थकारणात आपले भरीव योगदान देऊ लागले आहेत.

महिला सशक्तीकरण म्हणजे नेमके काय, तर त्यांनी स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावे त्याचप्रमाणे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम होऊन समाजाच्या विकासात महिलांनी सक्रिय भूमिका बजावू शकणे. त्यासाठी महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देणे गरेजेचे असते. ग्रामीण भागातील महिला विविध अडचणींचा सामना सतत करीत असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तेथील शिक्षणाचा अभाव. मुलगा आणि मुलींच्या शिक्षणाच्याबाबतीत पालकांकडूनच (जागृती नसल्याने) होणारा पक्षपात ही शैक्षणिक अभावाची कारणे. 'मुलीला शिकून काय करायचं आहे?' या मानसिकतेचसहच छोट्या- छोट्या गावांमध्ये नसलेली शैक्षणिक सुविधा हेही ग्रामीण मुली शिक्षणापासून दूर राहण्याचे महत्त्वाचे कारण होते. मुलींचे लवकर लग्न, आर्थिक अवलंबित्व, आरोग्य सुविधांची कमतरता, सामाजिक बंधने व परंपरा यांच्या दुष्टचक्रात ग्रामीण स्त्री अडकली होती. तिला त्यातून बाहेर काढणे गरजेचे होते. त्या पार्श्वभूमीवर महिला सशक्तीकरण अभियान अतिशय फायद्याचे ठरत आहे आणि त्याचे फार चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

महिला सशक्तीकरणामुळे मुलींच्या पारंपरिक शिक्षणाला प्रोत्साहनासहच त्यांना देण्यात येत असलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढू लागला आणि विविध ठिकाणी तिला रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. त्यामुळे हीच ग्रामीण स्त्री आता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ लागली आहे.

ग्रामीण भागात बहुतांश महिला शेतीशी जोडल्या गेल्या असतात. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय, हस्तकला, दुग्धव्यवसाय याद्वारे त्यांचे आर्थिक सक्षमीकरण वेगाने होऊ लागले. विविध गावांमध्ये स्थापन झालेल्या बचतगटांमुळे महिला एकत्र येऊन करीत असलेली वाटचाल क्रांती घडविणारी आहे. महिला सशक्तीकरणाच्या योजनेत छोट्या उद्योगांसाठी सरकारने त्यांना सुलभ कर्ज उपलब्ध करून दिले आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांची समाजातील प्रतिष्ठा वाढते, याची प्रचीती आज ग्रामीण भागात विशेषत्वाने येत आहे.

ग्रामीण महिलांचे आरोग्य हाही तसा उपेक्षित विषय. त्यामुळे जगाचा उद्धार करण्याची क्षमता असलेली ग्रामीण स्त्री विविध आजारांचे ओझे घेऊनच जगत राहायची. आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून संसाराचा गाडा ओढणाऱ्या स्त्रीसाठी साध्या आरोग्य सुविधाही गावात नव्हत्या. त्यामुळे माता व बाल मृत्यूचे सर्वाधिक प्रमाण ग्रामीण भागातच पाहायला मिळत होते. राज्य शासनाने या महिलांसाठी पोषण आहार योजना आणलीच पण छोट्या- छोट्या गावांमध्ये आरोग्य सेवा उपलब्ध करून देऊन कोवळी पानगळ थांबविली आहे. अलीकडेच अहेरी येथे खास महिलांसाठीच्या अत्याधुनिक रुग्णालयाचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. प्रकृती बिघडल्यावर मांत्रिकांकडे जाणाऱ्या या परिसरातील आदिवासी महिला आता या रुग्णालयाचा लाभ घेत आहेत. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातील या महिला रुग्णालयामुळे परिसरातील महिलांची मोठी सोय झाली आहे.

महिलांमध्ये कायदेशीर व सामाजिक जागरुकता येण्यासाठी वारसा, संपत्ती, शिक्षण याबाबत महिलांचे हक्क काय आहेत, कौटुंबिक हिंसाचाराविरोधात ती कशी उभी राहू शकते, यावर महिला सशक्तीकरण अभियानाचा भर असल्याने ग्रामीण भागातील बदलत असलेली परिस्थिती या अभियानाचे यश अधोरेखित करणारी आहे.

बेटी बचाओ बेटी पढाओ, महिला ई- हाट, उज्वला योजना या केंद्र सरकारच्या तसेच लाडकी बहीण या राज्यातील योजनेमुळेही महिला सशक्तीकरणाचा वेग वाढला हे नाकारता येत नाही. फक्त चूल आणि मूल सांभाळणारी ग्रामीण स्त्री आज पुरुषांच्या बरोबरीने राजकारणात येत आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढत आहे. ग्रामपंचायत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेल्या आरक्षणाचा हा लाभ आहे.

महिला सशक्त झाली की फक्त तिचीच प्रगती होते असे नव्हे, तर एकूण कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारते, मुलांच्या शिक्षणात वाढ होते आणि संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य व पोषण सुधारते. त्यामुळेच ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण हे केवळ महिलांसाठी नाही तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

महिला सशक्तीकरणाच्यादृष्टीने भारत सरकारने २०२३ मध्ये आणलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियमामुळे राजकारणात ३३ टक्के आरक्षणाची तरतूद झाली आहे शिवाय लखपती दीदी सारख्या योजनेमुळे राष्ट्र निर्माण कार्यात त्यांचा सहभाग वाढला आहे.

सुरक्षा व स्वावलंबन

मिशन शक्ती अंतगर्त महिला व मुलींना त्यांचे कायदेशीर अधिकार, सुरक्षा, आरोग्य याविषयी जागरुक केले जात आहे.

आर्थिक सशक्तीकरण

केंद्र सरकारच्या लखपती दीदी योजना, महिला हाट, राज्य सरकारची लाडकी बहीण याद्वारे महिलांना स्वरोजगारासाठी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यात येत आहे.

नारी शक्ती वंदन अधिनियम

या अधिनियमामुळे संसद तसेच राज्य विधानसभेत महिलांससाठी ३३ टक्के जागा आरक्षित करण्याचा ऐतिहासिक कायदा नारी शक्ती वंदन अधिनियमामुळे अस्तित्वात आला आहे. २०२९ पासून देशात हा कायदा लागू होणार आहे.

आरोग्य

जन औषधी केंद्रामधून १ रुपयात सॅनिटरी पॅड उपलब्ध करणे तसेच नवजात बालिकांसाठी कन्या जन्मोत्सव आयोजित केला जात आहे, ही या सशक्तीकरण अभियानाचीच उपलब्धी म्हणावी लागेल. मुलींच्या उज्वल भवितव्यासाठी सुकन्या समृद्धी योजना, ग्रामीण महिलांच्या सहायतेसाठी महिला शक्ती केंद्र, स्वच्छ इंधनासाठी उज्वला योजना, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना नारी शक्ती पुकस्कार अशा छोट्या- छोट्या उपाययोजनांमुळे महिला सशक्तीकरणाने वेग घेतलेला दिसत आहे.

आपली संस्कृती मातृ शक्तीची पूजक आहे. विविध जोखडातून तिला मुक्त करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात तसेच राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी पावले उचलली, त्यामुळे महिलांना प्रगतीचा मार्ग गवसला आहे. विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा, एवढाच या अभियानाचा उद्देश नाही, तर आत्मनिर्भर भारताचे नेतृत्व महिला करू शकतील, यादृष्टीने या अभियानाद्वारे होणारी पायाभरणी अतिशय महत्त्वाची आहे. उद्याच्या समृद्ध आणि विकसित भारताचे स्वप्न महिला सशक्तीकरण योजनेत दडलेले आहे, एवढे नक्की.

**- अविनाश महालक्ष्मे**

## लातूर येथे केंद्रीय राखीव पोलीस दलामार्फत शौर्य दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) दैदिप्यमान इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा ९ एप्रिल हा शौर्य दिन आज लातूर येथील सीआरपीएफ कॅम्पमध्ये मोठ्या अभिमानाने साजरा करण्यात आला.

९ एप्रिल १९६५ रोजी पाकिस्तानी सैन्याने गुजरातच्या कच्छ रणातील भारतीय चौक्यांवर कब्जा मिळवण्यासाठी 'ऑपरेशन डेजर्ट हॉक' सुरू केले होते. यावेळी सीमेवरील 'सरदार' आणि 'टाक' या चौक्यांच्या रक्षणाची जबाबदारी सीआरपीएफच्या दुसऱ्या बटालियनच्या जवानांवर होती. पहाटेच्या सुमारास पाकिस्तानी लष्कराच्या एका बलाढ्य ब्रिगेडने अचानक हल्ला चढवला, मात्र संख्येने कमी असूनही सीआरपीएफच्या जवानांनी अत्यंत धाडसाने हा हल्ला परतावून लावला. सलग १२ तास चाललेल्या या ऐतिहासिक लढाईत भारतीय जवानांनी पाकिस्तानी लष्कराचे ३४ जवान टिपले. एका निमलष्करी दलाने लष्कराच्या मोठ्या तुकडीला रोखून धरण्याची ही जगाच्या लष्करी इतिहासातील दुर्मिळ कामगिरी ठरली.

याच शौर्याचे स्मरण म्हणून आज लातूर येथील रंगरूट प्रशिक्षण केंद्रात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक अमिरुल हसन अंसारी यांनी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या संबोधनात अंसारी यांनी जवानांच्या अतुलनीय धैर्याचा गौरव केला आणि उपस्थित सर्व जवानांना व त्यांच्या परिवाराला शौर्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी समितीची बैठक उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीची बैठक महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात संपन्न झाली. या बैठकीला नवनियुक्त प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, प्रा.डॉ.बाळासाहेब गोडबोले, प्रा.डॉ. संजय गवई, प्रा.कल्याण कांबळे, ड.सुरेशचंद्र सलगरे, प्रा.संगमेश्र्वर पानगावे, गंगाधर शिनगारे आणि प्रा.प्रशांत उघाडे यांची उपस्थिती होती.

बैठकीच्या प्रारंभी महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल समितीच्यावतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या महिन्यात महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा बसवेश्र्वर या महापुरुषांच्या जयंत्या आहेत. तसेच वर्षभरात येणाऱ्या महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी आणि विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टिकोनातून सविस्तर चर्चा करण्यात आली. समितीचे व्यापक उद्दिष्ट समोर ठेवून महापुरुषांच्या आठवणी आणि विचारधारा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत रुजविण्याच्या अनुषंगाने समितती कार्यरत राहील असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला.

सर्व बुद्धीजीवी बहुजन कर्मचारी यांनी समितीत सहभागी होऊन समिती बळकट करणे काळाची गरज आहे, समितीच्या माध्यमातून विविध क्रीडा स्पर्धा, अनाथ, अंध, विद्यार्थ्यांसाठी सहाय्यपुरक उपक्रम, विविध व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद आणि चर्चासत्र आयोजीत करण्याच्या उद्देशाने सर्वानी मनोगते व्यक्त केली. तसेच व्यापक नियोजन करण्यासाठी पुढील बैठक शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ रोजी सायं. ०५ वा. महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. या बैठकीचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक आणि आभार प्रा.प्रशांत उघाडे यांनी केले.

## स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाले'च्या वतीने शनिवारी 'संवाद गिरीश कुबेर यांच्या शी चे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** विख्यात लेखक आणि 'दैनिक लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर हे संवाद साधण्यासाठी लातुरात येत आहेत. त्यांनी 'काळ्या सोन्या'चा ('तेल') अनेकांगी आणि सखोल शोध घेणारी ग्रंथत्रयी ही मराठी साहित्याचा अभिमान ठरली. त्यातून त्यांनी जगाचं राजकारण हे इतिहास आणि वर्तमान रक्तरंजित करणाऱ्या 'तेला' भोवती फिरत आहे, याचे सखोल विश्र्लेषण केले आहे.

'दाखवल्या' आणि 'खेळवल्या' जाणाऱ्या युद्धामागील सूत्रधार कोण असतात? बॉम्ब आणि क्षेपणास्त्रे न वापरता केवळ जीवजंतू पाठवून 'युद्ध'तयारी कशी होते? युद्धातून नफेखोरी कशी होते? अचाट आघाडी घेणाऱ्या चीनच्या विकासाचे स्वरूप नेमके कसे आहे? रशियाला महासत्ता बनवण्याचा ध्यास घेतलेले पुतीन कसे घडत गेले? व्यासंगी कुबेर यांनी हे उलगडून दाखविणारी पुस्तके लिहिली आहेत. त्याच काळात ते, वाचकांपर्यंत सर्व प्रकारचे विषय आणि मते पोहोचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत असतात. 'दैनिक लोकसत्ता'कडून सातत्याने साहित्य,कला,अर्थ, क्रीडा आणि उद्योग यांवर विशेषांक, मुलाखत, परिसंवाद असे कार्यक्रम आयोजित केले जातात. 'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट २०२५' हा मराठी साहित्य, कला आणि संस्कृतीचा भव्य बहुआयामी सोहळा ठरला. त्यात साहित्य, कविता, नाट्य, संगीत, लोककला आणि गझल अशा विविध क्षेत्रांतील कलाकारांचा सहभाग होता. वाडीवस्ती ते आंतरराष्ट्रीय घडामोडींवर नजर ठेवून ती वाचकांपर्यंत नेणारे अष्टावधानी संपादक प्रथमच लातुरात येत आहेत. स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्या वतीने शनिवार दि. ११ एप्रिल २०२६ रोजी, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या 'कस्तूर-कांचन ' सभागृहात, सायंकाळी ५.३० वाजता 'गिरीश कुबेर यांच्याशी संवाद' आयोजित केला आहे. त्यातून, लातूरकरांना सध्याचे जागतिक वातावरण ते मराठी मानसिकता अशा अनेक विषयांवरील परखड भाष्य ऐकता येणार आहे. या कार्यक्रमास लातूरकरांनी उपस्थित राहावे असे असे आवाहन श्रीनिवास लाहोटी, श्रीमती सुमती जगताप, डॉ.अजित जगताप, अतुल देऊळगावकर, कमलकिशोर अग्रवाल आणि डॉ.मिलिंद पोतदार यांनी केले आहे.

# ५३ व्या राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६ ची पुण्यात सुरुवात

**पुणे/पीआयबी:** ५३ वी, राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६ आजपासून पुण्यात सुरू झाली. केंद्रीय विद्यालय संगठनने आयोजित केलेले हे तीन दिवसीय प्रदर्शन, ८ ते १० एप्रिल २०२६ दरम्यान, पीएम श्री केंद्रीय विद्यालय गणेशखिंड इथे होत आहे.

या प्रदर्शनातून, देशभरातल्या २५ केंद्रीय विद्यालयांमधील, उदयोन्मुख ५७१ विद्यार्थी वैज्ञानिकांना त्यांचे वैज्ञानिक कौशल्य आणि सर्जनशीलता दाखवण्याची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांमधे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधक वृत्ती वाढवणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

यंदाच्या प्रदर्शनाची संकल्पना,विकसित आणि आत्मनिर्भर भारत अशी असून, देश स्वयंपूर्ण बनवण्यासाठीची मॉडेल्स आणि त्यासाठीचे प्रयोग यात मांडण्यात आले आहेत.



प्रदर्शनातील मुख्य आकर्षणामध्ये खालील गोष्टी आहेत:

* विज्ञान आणि तंत्रज्ञान आधारित मॉडेल्स
* पर्यावरण संवर्धनावरील प्रकल्प
* अक्षय ऊर्जा क्षेत्राशी संबंधित नवोन्मेष
* कृषी आणि आरोग्यक्षेत्राशी संबंधित प्रयोग.

प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि एआरडीईचे सहयोगी संचालक, आर. पी. पांडे यांनी, सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विज्ञान क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी, जिज्ञासा , अविरत कष्ट आणि सातत्यपूर्ण प्रयोगशीलता आवश्यक असते, यावर त्यांनी भर दिला.

केंद्रीय विद्यालयाच्या दिल्ली मुख्यालयाचे सह आयुक्त, (शिक्षण) सौमित श्रीवास्तव, आभासी पद्धतीने ह्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी वेगवेगळे प्रयोग मांडणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच, अ-पारंपरिक ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत, त्यांनी उत्तम आरोग्य राखण्याचाही सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

केव्हीएस च्या मुंबई कार्यालयाचे उपायुक्त, बी.के. बेहरा, सह आयुक्त, सुमित मेहरा, आणि यजमान शाळेचे मुख्याध्यापक अविजित पांडा, विविध केंद्रीय विद्यालयांचे मुख्याध्यापक, शिक्षण आणि परीक्षक या कार्यक्रमाला उपस्थित होते. आपल्या स्वागतपर भाषणात, बी. के. बेहरा यांनी विद्यार्थ्यांना परिवर्तन घडवणारे होण्यासाठी प्रोत्साहन देत, वैज्ञानिकदृष्ट्या प्रगत असा भारत घडवण्यात योगदान देण्याचे आवाहन केले. तर सुमित मेहरा यांनी, विद्यार्थ्यांना, नवनवे तंत्रज्ञान शिकण्याचा, प्रयोगशील राहण्याचा आणि आपल्या कल्पना आत्मविश्वासाने मांडण्याचा सल्ला दिला.

अविजित पांडा यांनी विकसित आणि आत्मनिर्भर राष्ट्र घडवण्यासाठी स्टेम डढएच् शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. उद्घाटन समारंभात पुण्यातील विविध केंद्रीय विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले. हे प्रदर्शन विद्यार्थ्यांना केवळ स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देत नाही, तर त्यांना नवे काही शिकण्यासाठी, शोध घेण्यासाठी आणि भविष्यातील शास्त्रज्ञ होण्याची प्रेरणा देणारेही आहे.

### वीज सेवेची माहिती मिळणार एसएमएस सेवेद्वारे


## लातूर परिमंडलातील बारा लाख ९८ हजार वीजग्राहकांची महावितरणकडे नोंदणी

**लातूर/प्रतिनिधी :** गाहकाभिमूख सेवा देण्यासाठी महावितरण सातत्याने विविध प्रयत्न करत असते. त्याच सुविधेचा भाग म्हणून वीजग्राहकांना अनेक सेवा घरबसल्या देण्यास महावितरणने सुरुवात केलेली आहे. सर्व प्रकारच्या वीजसेवांची माहिती ग्राहकांच्या मोबाइलवर एसएमएसद्वारे दिली जाते. वीजबिल तसेच वीजपुरवठा बंदचा कालावधी व इतर माहिती मिळवण्यासाठी लातूर परिमंडलातील १२ लाख ९८ हजार ४० वीजग्राहकांनी महावितरणकडे मोबाइल क्रमांक नोंदवला आहे.

लातूर, बीड व धाराशिव या तीन जिल्हयांचा समावेश असलेल्या लातूर परिमंडलातील कृषीपंप ग्राहकांसह सर्व वर्गवारीतील एकूण १५ लाख २ हजार ९६२ वीजग्राहकांपैकी १२ लाख ९८ हजार ४० वीजग्राहकांनी महावितरणकडे मोबाइल क्रमांक नोंदवला आहे. यात घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर या वर्गवारीतील १० लाख ६ हजार ३९३ ग्राहकांपैकी ९ लाख ३४ हजार ९८ ग्राहकांचा अर्थात ९२.८१ टक्के ग्राहकांचा समावेश आहे. तर कृषिपंप वर्गवारीतील ४ लाख ९६ हजार ५६९ ग्राहकांपैकी ३ लाख ६३ हजार ९४२ ग्राहकांचा अर्थात ७३.२९ टक्के ग्राहकांचा समावेश आहे. लातूर मंडलात सर्व वर्गवारीतील ५ लाख ९६ हजार २१८ वीजग्राहकांपैकी ५ लाख ३५ हजार ३८० ग्राहकांनी, बीड मंडलात ४ लाख ७६ हजार ५७३ वीजग्राहकांपैकी ४ लाख ९ हजार ९ ग्राहकांनी, तर धाराशिव मंडलात ४ लाख ३० हजार १७१ वीजग्राहकांपैकी ३ लाख ५३ हजार ६५१ वीजग्राहकांनी महावितरणकडे मोबाइल क्रमांक नोंदवला आहे.

या ग्राहकांना वीजबिलाची माहिती, तांत्रिक बिघाड किंवा नियोजित देखभाल व दुरुस्तीमुळे वीजवाहिनीवरील बंद असलेला वीजपुरवठा पूर्ववत होण्याचा कालावधी, मीटर रीडिंग, बिल भरण्याची अंतिम तारीख, बिल प्राप्त झाल्याचा संदेश यासह विविध वीजसेवांची माहिती 'एसएमएस'द्वारे पाठवण्यात येते. परिमंडलातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, कृषी व इतर अशा सर्व वर्गवारीतील ८६.३७ टक्के ग्राहकांच्या मोबाइल क्रमांकांची नोंदणी झालेली आहे. असे असले तरीही ज्या ग्राहकांना आपला मोबाइल क्रमांक नोंदवायचा आहे अथवा बदलायचा आहे, त्यांनी १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ व १८००-२३३-३४३५ या २४ तास सुरू असणाऱ्या टोल फ्री क्रमांकांवर किंवा महावितरणच्या https://pro.mahadiscom.in/ConsumerInfo/consumer.jsp या संकेतस्थळावर किंवा महावितरण ॲपवर नोंदणी करावी, असे आवाहन मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांना यशाचे शिखर गाठण्याची सुवर्ण संधी - विभागीय शिक्षण उपसंचालक मा.दीपक चवणे



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयास लातूर विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक मा.दीपक रामराव चवणे यांनी पदावर रुजू झाल्यानंतर पहिल्यांदाच जिल्हास्तरीय आढावा बैठकीच्या निमित्ताने दि.०९ एप्रिल २०२६ रोजी भेट दिली. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार मा.दीपक रामराव चवणे यांचा यथोचित सन्मान व सत्कार महाविद्यालयात करण्यात आला. याप्रसंगी माध्यमिक जि.प.लातूर मा.शिक्षणाधिकारी संजय क्षिरसागर, शिक्षणाधिकारी योजना (प्राथमिक विभाग, लातूर) तृप्ती अंधारे, सहाय्यक शिक्षण उपसंचालक लातूर विभागाचे संजय पंचगल्ले, डायट मुरुडचे प्राचार्य डॉ.मारुती सलगर, दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,प्रा.बळवंत सूर्यवंशी, प्रा.विजयकुमार मांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दयानंद विज्ञान महाविद्यालयातील शिक्षण पद्धतीचा आढावा घेत असताना मा.दीपक चवणे यांनी प्रत्यक्षरित्या इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधत समाधान व्यक्त केले.तसेच विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने महाविद्यालयात शिक्षण कसे दिले जाते व कोणकोणत्या सोयी सुविधा आहेत याचेही अनुभव जाणून घेतले.यावेळी प्रत्यक्ष पाहणीनंतर ते म्हणाले की, दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालय हे शिक्षणाचे हब असून महाविद्यालयातील तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद, विद्यार्थी समस्या निर्मूलन केंद्र,नाईट रिडींगची सोय,स्मार्ट बोर्ड युक्त खोल्या, मुला-मुलींसाठीचे उत्तम वसतीगृह,डिजिटल शिक्षणावर दिलेला भर, ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणाची सोय, जेईई,सीईटी व नीटच्या यशाची खात्री,संगणकयुक्त लॅब, संस्थेचा सुसज्ज परिसर,थेअरी व प्रॅक्टिकली शिक्षण,वेळोवेळच्या सराव परीक्षा,सर्व सोयीसुविधा येथे उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांसाठी पोषक शैक्षणिक वातावरण आहे. म्हणूनच गुणवंत विद्यार्थी घडविणाऱ्या या सर्वोत्कृष्ट दयानंद महाविद्यालयातून यशाचे शिखर गाठले पाहिजे व करिअर घडविले पाहिजे, येथे यशाचे शिखर गाठण्याची सुवर्णसंधी आहे,असे ते म्हणाले.याप्रसंगी महाविद्यालयातील इतर शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या ५० गौरवशाली वर्षांची पूर्तता : सोलापूर येथे जल्लोषात सुवर्णमहोत्सव साजरा

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातर्फे १२११६/१२११५ सोलापूर-मुंबई (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) सिद्धेश्र्वर सुपरफास्ट एक्सप्रेसच्या ५० वर्षांच्या यशस्वी सेवेनिमित्त ८ एप्रिल २०२६ रोजी सोलापूर रेल्वे स्थानकावर मोठ्या उत्साहात व दिमाखात सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला. रेल्वेच्या नियोजित सुटण्याच्या वेळेपूर्वी (२२:३० वाजता) हा सोहळा पार पडला.

या ऐतिहासिक टप्प्याचे औचित्य साधून शाखा अधिकारी, रेल्वे कर्मचारी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी, रेल्वेप्रेमी, प्रवासी संघटना तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या उपस्थितीत हा सोहळा जल्लोषात पार पडला. सिद्धेश्र्वर एक्सप्रेसच्या इंजिनची फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली व हार घालून सन्मान करण्यात आला, ज्यातून या प्रतिष्ठित गाडीचा अभिमान व वारसा अधोरेखित झाला. तसेच ५० व्या वर्धापनदिनानिमित्त केक कापण्याचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला, ज्यामुळे उत्सवाचे वातावरण अधिक आनंददायी झाले.





आरपीएफ बँडच्या सुरेल वादनाने कार्यक्रमात रंगत आणली आणि स्थानकावर उत्सवी वातावरण निर्माण झाले. या सोहळ्याला विशेष स्पर्श देत सोलापूरमधील तरुण रेल्वेप्रेमींनी सिद्धेश्र्वर एक्सप्रेसच्या संस्मरणीय क्षणांचा फोटोफ्रेम सोलापूर विभागाला भेट दिला, ज्यातून या गाडीबद्दल लोकांच्या भावनिक नात्याचे दर्शन घडले.

८ एप्रिल १९७६ रोजी सुरू झालेली सिद्धेश्र्वर एक्सप्रेस ही गेल्या पाच दशकांपासून सोलापूर-मुंबई दरम्यान महत्त्वाची रात्रीची जोडणी म्हणून कार्यरत असून संपर्क, विश्र्वासार्हता आणि अभिमानाचे प्रतीक बनली आहे. संत श्री सिद्धरामेश्र्वर यांच्या नावावरून नामकरण झालेली ही गाडी प्रदेशाच्या समृद्ध सांस्कृतिक व आध्यात्मिक वारशाचे प्रतीक आहे. सोलापूर व परिसरातील नागरिकांसाठी ही गाडी केवळ प्रवासाचे साधन नसून जीवनरेखा आहे-आर्थिक, प्रशासकीय व सांस्कृतिक उपक्रमांसाठी अखंड जोडणी उपलब्ध करून देते. तसेच पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर यांसारख्या प्रमुख धार्मिक स्थळांसाठी तसेच प्रसिद्ध श्री सिद्धेश्र्वर गड्डा यात्रेदरम्यानही ही गाडी महत्त्वाची सेवा बजावते.

काळानुरूप भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरण उपक्रमांनुसार सिद्धेश्र्वर एक्सप्रेसमध्ये लक्षणीय बदल करण्यात आले आहेत. सुरुवातीच्या काळात डिझेल इंजिन व पारंपरिक आयसीएफ डब्यांसह सुरू झालेली ही सेवा आज पूर्णपणे विद्युतीकृत मार्गावर उच्च क्षमतेच्या WAP-7 विद्युत इंजिनद्वारे चालणारी सुपरफास्ट सेवा बनली आहे. नोव्हेंबर २०१८ मध्ये आधुनिक एलएचबी डब्यांमध्ये रूपांतर हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला, ज्यामुळे सुरक्षितता, वेग व प्रवासी सुविधा यामध्ये मोठी वाढ झाली. सध्या ही गाडी २२ एलएचबी डब्यांसह सर्व प्रवासी वर्गांसाठी सेवा देते. सुमारे ८ तास ५ मिनिटांत ४५५ किमी अंतर पार करत ही गाडी मोहोळ, माढा, कुर्डुवाडी, जेऊर, दौंड, पुणे, कल्याण, ठाणे व दादर या महत्त्वाच्या स्थानकांना जोडते. निवडक मार्गांवर १३० किमी/ताशी कमाल वेगासह ही गाडी वेळेची काटेकोरता व कार्यक्षमता राखत आहे.

या ऐतिहासिक प्रसंगी सोलापूर विभागाने प्रवाशांच्या सुरक्षितता, आराम व सेवागुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुनरुज्जीवन केली. सिद्धेश्र्वर एक्सप्रेस आपल्या नव्या प्रवासाला सुरुवात करत असताना, ती आपला समृद्ध वारसा पुढे नेत लोकांना जोडत राहील, प्रगतीला चालना देईल आणि भारतीय रेल्वेच्या अविरत सेवेचे प्रतीक राहील.

## पानचिंचोली येथे होणाऱ्या समाधान शिबीराच्या तयारीची बैठक संपन्न

निलंगा (प्रतिनिधी):- महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र समाधान शिबिर अभियान अंतर्गत महसूल मंडळ पानचिंचोली, तालुका निलंगा येथे दि. १० एप्रिल २०२६ रोजी भव्य समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे ठिकाण हनुमान मंदिर, पानचिंचोली असे निश्र्चित करण्यात आले आहे.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी माननीय उपविभागीय अधिकारी श्री. शरदजी झाडके साहेब व माननीय तहसीलदार श्री. प्रसादजी कुलकर्णी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पानचिंचोली येथे मंडळ अधिकारी श्री. निळकंठ जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर आढावा बैठक पार पडली.या बैठकीस महसूल मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी अमर सुरवसे, गणेश पानखडे, किशोर चव्हाण, दिगंबर वाघे, विजया सोमवंशी, ग्रामपंचायत अधिकारी गिरी साहेब, गावातील सरपंच, उपसरपंच, प्रतिष्ठित नागरिक, कोतवाल, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, तंटामुक्ती समिती अध्यक्ष तसेच सर्व उडउ व आधार केंद्र चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान समाधान शिबिरामध्ये नागरिकांना विविध महसुली व शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण, ७/१२ व ८अ दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी, जातीचे दाखले, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यावर भर देण्यात येणार आहे.तसेच शिबिरासाठी व्यापक जनजागृती करण्यासाठी ग्रामपातळीवर दवंडी, सूचना फलक, सोशल मीडियाचा वापर, तसेच प्रत्येक नागरिकापर्यंत माहिती पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सदर समाधान शिबिरामध्ये पानचिंचोली व परिसरातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, समता सप्ताहात उद्देशिका देवून विजय गायकवाड सन्मानित



धाराशिव (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने राज्यभर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे ०८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या काळात आयोजन केले आहे. धाराशिव येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि. ०८/०४/२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे समता सप्ताहाचे उद्दघाटन करण्यात आले.

या कार्यक्रमात धाराशिव येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त साहित्यिक इतिहासाचे अभ्यासक विजय गायकवाड यांचा संविधान उद्देशिका देवून जिल्हाधिकारी किर्तीकिरण पुजार, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, जात पडताळणी सचिव बलभीम शिंदे, सहाय्यक संचालक अमोल ताकभाते, सहाय्यक आयुक्त सचिन कवले, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील कर्मचारीवृंद उपस्थित होते. या सन्मानाबद्दल गायकवाड यांचे मित्र परिवारातून अभिनंदन होत आहे.

## कळंब तालुका शिक्षक पतसंस्थेला ३ कोटी ६१ लाख नफा,१०५ कोटी वार्षिक आर्थिक उलाढाल- अध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांची माहिती



कळंब (प्रतिनिधी)- कळंब तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये ३ कोटी ६१ लाख रुपये ढोबळ नफा झाला असून संस्थेची वार्षिक आर्थिक उलाढाल १०५ कोटी पेक्षा अधिक झाली असल्याची माहिती शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष तथा प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांनी दिली.

कळंब तालुका शिक्षक सहकारी पतसंस्था ही कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेमध्ये राज्यामध्ये नावलौकिक मिळवलेली पतसंस्था असून या संस्थेला गेल्या २०२५- २०२६ या आर्थिक वर्षामध्ये ३ कोटी ६१ लाख रुपये ढोबळ नफा झाला असून संस्थेची वार्षिक उलाढाल १०५ कोटी रुपये पेक्षा अधिक आहे. ही जिल्ह्यातील इतर कर्मचारी संस्थेपेक्षा अधिक आहे. संस्थेचा भाग भांडवल ५ कोटी ५४ लाख असून मुदत व कायम ठेवी ४० कोटी आहेत. तसेच गंगाजळी, इमारत निधी, शिक्षक कल्याण निधी व गुणवत्ता विकास निधी मिळवून ३ कोटीपेक्षा अधिक रक्कम जमा आहे.

गेल्या आर्थिक वर्षात संस्थेने ५० कोटी ३७ लाख रुपये कर्ज वाटप केले आहे. जिल्ह्यातील सर्वात जास्त आर्थिक उलाढाल असणारी ही एकमेव शिक्षक पतसंस्था आहे.

ही पतसंस्था स्थापनेपासून स्वभांडवलावर कर्ज वाटप करत असून सध्या कर्ज मर्यादा ३० लाख रुपये केली असून कर्जाचा व्याजदर ८.५ इतका आहे. तसेच सभासदांना प्रत्येक वर्षी जमा भागावर १५ टक्के लाभांश दिला जातो.

एखाद्या सभासदाचा कोणत्याही करणारे मृत्यू झाल्यास सभासदाचे संपूर्ण कर्ज संस्था माफ करते. तसेच सभासदांच्या मुलीच्या लग्नामध्ये ११ हजार रुपये कन्यादान ही संस्थेच्या वतीने मुलीला दिले जाते.

या संस्थेच्या प्रगतीसाठी संस्थेच्या सर्व सभासदांचे सहकार्य मिळत आहे. संस्थेचा एनपीए शून्य टक्के असून संस्थेच्या प्रगतीसाठी संस्थेचे उपाध्यक्ष भागवत जाधवर, संचालक भक्तराज दिवाने, दत्तात्रय पवार, भूषण नानजकर, गणेश कोठावळे दत्तात्रय सुरेवाड, रवींद्र शिनगारे, अशोक डीकले,दीपक चाळक, रामचंद्र पवार, श्रीमती वैशाली क्षिरसागर श्रीमती कालिंदा मुंडे श्रीमती ज्योती ढेपे व सचिव संतोष ठोंबरे, हिशोबनीस शिवाजी शिंदे तसेच लिपिक राहुल तामाने व कृष्णा जाधव यांचे मोलाचे सहकार्य मिळत असल्याचं श्री. तांबारे यांनी सांगितले.

या संस्थेच्या पारदर्शी काटकसरीच्या व नियमित वसुलीच्या कारभाराबद्दल राज्य शिक्षक संघाचे उपाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष संतोष देशपांडे, उपाध्यक्ष अनिल बारकुल, सरचिटणीस विठ्ठल माने,प्रदीप म्हेत्रे,तालुका अध्यक्ष प्रशांत घुटे,महादेव मेनकुदळे,संतोष लिमकर व प्रशांत निन्हाळ यांनी अभिनंदन केले

## बत्तिसावे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन २९, ३० मे रोजी धाराशिव मध्ये होणार




**धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)**-अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद या साहित्यातल्या आग्रणी असलेल्या संस्थेच्या वतीने ३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन दिनांक २९ व ३० मे २०२६ रोजी धाराशिव येथे संपन्न होणार आहे.

दिवंगत लोकनेते अजितदादा पवार साहित्य नगरी यांचे नाव देण्यात आले आहे अशी माहिती साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर शरद गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

यावेळी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर पतंगे उपस्थित होते. ग्रंथदिंडी उद्घाटन समारंभ, परिसंवाद, चर्चासत्र, कथाकथन ,कवी संमेलन असे संमेलनाचे स्वरूप असून या साहित्य संमेलनास देशभरातून नऊशे साहित्यिक उपस्थित राहणार आहेत .या अगोदर पुणे, मुंबई, संगमनेर, छत्रपती संभाजी नगर, लातूर, उदगीर ,जव्हार, सांगली, कराड, गोंदिया तुळजापूर आदी ठिकाणी हे साहित्य संमेलन संपन्न झाले असून या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद द. मा. मिराजदार, नारायण सुर्वे, सुरेश भट, केशव मेश्राम, रा र बोराडे, नरेंद्र जाधव, लक्ष्मण माने, शिवाजी सावंत, गंगाधर पानतावणे, आदी जणांनी भूषवले असून जावेद अख्तर, पु. ल. देशपांडे ,शरद पवार ,ना धो महानोर, आधी जणांनी संमेलनाचे उदघाटन केले आहे

## देवीच्या शेरणीसाठी राज्यभरातील बँजो अनाळ्यात दाखल



धाराशिव (प्रतिनिधी)- अनाळा हलगी, लेझिमच्या कडकडाटात छबिना, विद्युत रोषणाईने परिसर उजळला होता. शेरणीसाठी राज्यभरातील बँजो दाखल झाले होते. छबिना मिरवणुकीत भाविकाचा उत्साह दिसत होता.

रविवारी ( दि.५) सकाळी गोकुळ जाधव व भारत जाधव यांची मानाची देवीची कमान मिरवणुकीने प्रारंभ झाला. दुपारी ३ वाजता पारंपरिक बढाण कार्यक्रम संपन्न झाल्या नंतर विविध मंडळाच्या वतीने देवीसाठी शेरणी काढण्यात आल्या. या शेरणीसाठी राज्यातील नामांकित बॅन्जो दाखल झाले होते. फटाक्यांची आतषबाजी व विद्युत रोषनाईने अनाळा गांवात सर्वत्र झगमगाट दिसून येत होता. यात्रेनिमित्त संध्याकाळी देवीचा छबिना कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये विविध वेशभूषा परिधान करून तरुणांनी लक्ष वेधले होते. सोमवारी (दि. ६) सकाळी कालिका देवीच्या पालखीची मिरवणूक हलगीच्या कडकडाटात व लेझीम पथकांच्या माध्यमातून गावात काढून मिरवणूक १२ वाजता कालिका देवी मंदिरात पोहचली.

यात्रेनिमित्त विविध खेळणी, मिठाईची दुकाने, लहान मुलांचे पाळणे उभारण्यात आले होते. यात्रा यशस्वी करण्यासाठी यात्रा कमिटी व ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले. आखाडा यशस्वी करण्यासाठी पै.दादासाहेब फराटे, पैलवान नागनाथ क्षीरसागर, पै.बालाजी मांजरे, ईश्वर क्षीरसागर, लक्ष्मण क्षीरसागर यांच्यासह ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले . येथील युवा प्रतिष्ठानच्या वतीने ग्रामदैवत कालिकादेवी यात्रेनिमित्त किरण कोरे व टीमचा मराठी लावणी व हिंदी गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

तसेच यात्रेचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान जि. प. कृषी सभापती भाऊसाहेब खरसडे, सरपंच जोतीराम क्षीरसागर, माजी जि. प. दत्तात्रय पाटील, सहायक पोलिस निरीक्षक गोरक्ष खरड यांच्या हस्ते करण्यात आला.

सोनारीचा मेघराज ठरला कालिका केसरी सोनारीत झालेल्या कुस्ती स्पर्धेत कालिका देवी केसरीसाठी आयोजित आखाड्यात नामांकित मल्लांनी उत्साहवर्धक प्रदर्शन केले. या स्पर्धेत कालिका देवी केसरीसाठी प्रथम बक्षीस रु. ४१,००० ठेवण्यात आले होते, तसेच मानाची चांदीची गदा राखीव ठेवण्यात आली होती. ही चांदीची गदा कै. दत्तात्रय फराटे यांच्या स्मरणार्थ पै. माजी उपसरपंच दादासाहेब फराटे यांनी प्रदान केली होती. आखाड्यातील स्पर्धा अत्यंत रोमहर्षक ठरली; नामांकित मल्लांनी आपले कुस्ती कौशल्य सादर केले आणि प्रेक्षकांनी उत्साहात भर घालला. अंतिम टप्प्यात कालिका देवी केसरीचा मानकरी म्हणून सोनारीचा मेघराज जगताप ठरला. स्पर्धेच्या निमित्ताने आखाड्यात मोठी गर्दी जमली होती, ग्रामस्थांनी आपल्या पसंतीच्या मल्लासाठी बक्षिसांचा वर्षाव करून स्पर्धेला उत्साहवर्धक रूप दिले.

## धाराशिव येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत रविवारी बक्षीस, पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

धाराशिव (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील सर्वात मोठा, बहुभाषिक अग्रगण्य वृत्तसमूह दैनिक 'पुण्य नगरी'च्या कुपन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण, पुण्य पुरस्कार व जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या कै.अनंत भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा धाराशिव येथे रविवारी (दि.१२) संपन्न होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बक्षीस व पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

धाराशिव शहरातील नगर परिषदनजिकच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात रविवारी स. ११ वा. हा सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे रोहयो, फलोत्पादन मंत्री भरत शेठ गोगावले, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफार्मेशनचे (मित्रा) मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी, माजी मंत्री आ. डॉ. तानाजीराव सावंत, आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. कैलास घाडगे पाटील, आ. प्रविण स्वामी, माजी आ. ज्ञानराज चौगुले यांची उपस्थिती राहणार आहे.

या सोहळ्यात उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते दैनिक 'पुण्य नगरी'च्या कूपन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. या सोहळ्यात सहकार क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल धाराशिव जनता सहकारी बँकेचे चेअरमन हभप वसंतराव नागदे, रुपामाता उद्योग समूहाचे चेअरमन ड. व्यंकटराव गुंड, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल सह्याद्री हॉस्पीटल, अंकुर शिशुगृहाचे सर्वेसर्वा डॉ. दिग्गज दापके-देशमुख, बचत गट कार्यातून महिला सक्षमीकरणच्या उत्कृष्ट कार्याबद्दल राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या अर्चना माने, कसबे तडवळे (ता.धाराशिव) येथील आदर्श शिक्षक बाळासाहेब जमाले, व्यसनमुक्ती क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल येरमाळा येथील श्री येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक डॉ. संदीप तांबारे, तुळजापूर तालुक्यातील वडगाव (काटी) येथील प्रगतशील शेतकरी हणमंत गवळी, पार्डी (ता. वाशी) येथील पोल्ट्री उद्योजक विठ्ठल चौधरी, जकेकुरवाडी(ता.उमरगा) येथील आदर्श सरपंच अमर सूर्यवंशी यांना दैनिक 'पुण्य नगरी' समूहाचा पुण्य पुरस्कार उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. धाराशिव जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या कै. अनंत भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्काराचे वितरणही यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यामध्ये शोधवार्ता गटातून प्रथम बालाजी पांडुरंग वडजे (उमरगा), अमोल भास्कर मुळे द्वितीय (बीड), राजहंस तुकाराम कांबळे (उदगीर, जि.लातूर) व रोशन मुल्ला तृतीय(उदगीर, जि.बीड) तर विशेष वार्ता गटातून माधव आटकोरे (नांदेड) प्रथम , रमेश अर्जुन कदम (हिंगोली) द्वितीय, दिपक लिंबराज बारकुल (येरमाळा, जि.धाराशिव) व डॉ. रविंद्र भताने (चापोली, जि.लातूर) तृतीय यांना कै. अनंत भालेराव स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या बक्षीस, पुरस्कार वितरण सोहळ्यास जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक 'पुण्य नगरी'चे जिल्हा वृत्त संपादक धनंजय रणदिवे, पत्रकार संघाचे सरचिटणीस संतोष जाधव, सहसरचिटणीस राजाभाऊ वैद्य, कोषाध्यक्ष संतोष हंबीरे, उपाध्यक्ष अब्बास सय्यद (भूम) व श्रीकांत कदम (तुळजापूर) यांनी केले आहे.

## अमृत परिवार सर्वेक्षण अभियानाला सुरुवात आर्थिक दुर्बल घटकांपर्यंत योजनांचा थेट लाभ

धाराशिव (जिमाका)- महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.या योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचावा,यासाठी राज्यभर व्यापक स्तरावर अमृत परिवार सर्वेक्षण अभियान हाती घेण्यात आले आहे.

या अभियानाअंतर्गत धाराशिव जिल्ह्यात ८ एप्रिल ते २५ या कालावधीत सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे.खुल्या प्रवर्गातील ज्या समाजघटकांना इतर कोणत्याही संस्था किंवा महामंडळांच्या योजनांचा लाभ मिळत नाही,तसेच वार्षिक कौटुंबिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना या उपक्रमातून विशेष प्राधान्य देण्यात येत आहे.

अमृत संस्थेच्या लक्ष्यित गटात ब्राह्मण,सिंधी,हिंदू मारवाडी, गुजराती,पटेल,राजपूत, राजपुरोहित,हिंदू नेपाळी,बनिया,कम्मा,कायस्थ,अय्यंगार,नायर, नायडू,पाटीदार,बंगाली,भूमिहार, येलमार, ठाकूर,त्यागी,सेनगुनथर, जाट,कानबी,कोमटी/वैश्य आदी समाजघटकांचा समावेश आहे.या घटकांतील विद्यार्थी,तरुण,महिला, व्यावसायिक व शेतकरी यांच्यासाठी संस्थेमार्फत विविध विकासाभिमुख योजना उपलब्ध आहेत.

सर्वेक्षणाच्या कालावधीत अमृत संस्थेचे प्रतिनिधी लक्ष्यित कुटुंबांशी थेट संपर्क साधून माहिती संकलित करणार आहेत.तसेच विविध सामाजिक संस्था,संघटना व मंडळांकडूनही आवश्यक माहिती घेण्यात येणार आहे. संबंधित घटकांतील व्यक्ती,संस्था व संघटनांनी या कालावधीत अमृत प्रतिनिधींशी संपर्क साधून आपल्या कुटुंबाची तसेच समाजाची माहिती नोंदवावी आणि उपलब्ध योजनांची सविस्तर माहिती घ्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या कुटुंबाची नोंदणी करून घ्यावी,असे आवाहन अमृत संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी : चिन्मय कुलकर्णी,जिल्हा व्यवस्थापक, अमृत,धाराशिव मो. ७३९१०६५४६९ यांचेशी संपर्क साधावा.


# लातूर समाचार धाराशिव

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649